सोलापूर
तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २० मे २०२६

आतील पानावर

पान २– 'रीसेट'मध्ये झळकणार प्रियंका
पान ३– शाहिदसोबत दिसणार जान्हवी
पान ४– मराठमोळी अभिनेत्री गाजवणार...
पान ५– 'तुंबाड २'मध्ये झळकणार आलिया
पान ७– 'स्पिरिट'ची रिलीज डेट झाली जाहीर



## 'जन नायगन' प्रदर्शनासाठी सज्ज

तमिळ चित्रपटसृष्टीतील महासुपरस्टार जोसेफ विजय यांनी राजकारणात ऐतिहासिक पाऊल टाकत तमिळनाडूच्या मुख्यमंत्रिपदाची धुरा सांभाळली आहे. विजय यांच्या या राजकीय प्रवासासोबतच आता त्यांच्या चाहत्यांसाठी सिनेसृष्टीतूनही एक आनंदाची बातमी समोर आली आहे. विजय यांचा शेवटचा आणि बहुप्रतिक्षित चित्रपट 'जन नायगन' लवकरच चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. विजय यांच्या शपथविधी सोहळ्यात उपस्थित असलेल्या केव्हीएन (घतछ) प्रॉडक्शन्सचे संस्थापक व्यंकट के. नारायण यांनी चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत महत्त्वाची माहिती दिली. पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, चित्रपटासाठी केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाकडून अंतिम प्रक्रिया सुरू आहे. आम्ही सेन्सॉर बोर्डाशी चर्चा करत आहोत आणि साधारणपणे पुढील १४ दिवसांत हा चित्रपट प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. जोसेफ विजय यांनी राजकारणात पूर्णवेळ सक्रिय होण्यासाठी 'जना नायकन' हा आपला शेवटचा चित्रपट असल्याचे जाहीर केले होते. आता ते राज्याचे मुख्यमंत्री झाल्यामुळे या चित्रपटाबद्दलची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. आम्ही खूप आनंदी आणि उत्साहित आहोत अशा भावना निर्मात्यांनी यावेळी व्यक्त केल्या. मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर अवघ्या दोन आठवड्यांत विजय यांचा चित्रपट पडद्यावर येणार असल्याने चाहत्यांचे उत्सवाचे वातावरण आहे.

# 'जी ले जरा'च्या कास्टिंगमध्ये बदल?

प्रियांका चोप्रा, आलिया भट्ट आणि कतरिना कैफ या तीनही दिग्गज अभिनेत्रींना एकत्र आणणारा दिग्दर्शक फरहान अख्तरचा 'जी ले जरा' सिनेमा नक्की येणार की नाही यावर प्रश्नचिन्हच आहे. २०११ मधील 'डॉन २' नंतर फरहान या चित्रपटाद्वारे दिग्दर्शनात परतणार असल्याने चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता होती. मात्र, तारखांच्या समस्येमुळे आणि इतर तांत्रिक कारणांमुळे या चित्रपटाचे चित्रीकरण अद्याप सुरू होऊ शकलेले नाही. तर आता चित्रपटाच्या कास्टिंगमध्ये बदल होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. या चर्चांवर फरहानने उत्तर दिलं आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत फरहानने या अनिश्चिततेवर आपले मौन सोडले आहे. तो म्हणाला की, या सगळ्यामागे एक अनाकलनीय परिस्थिती आहे. मी हे शब्दात सांगू शकत नाही पण मला हे करायचंय. हा असा अनुभव आहे जो मी घेतला नाही तर मी आयुष्यात काहीतरी गमावलंय असंच मला वाटत राहील. गेल्या साडेचार वर्षांपासून दिग्दर्शक म्हणून मी सिनेमा बनवण्याचा प्रयत्न करतोय पण काही ना काही कारणाने एक एक चाक निखळून पडत आहे. पण तरीही मी हा सिनेमा करण्यासाठी उत्सुक आहे. मला असं वाटतंय युनिव्हर्स जणू माझी परीक्षाच घेत आहे. त्यामुळे आता मी त्या शेवटच्या अडथळ्यावर मात करत सर्व गोष्टी पुन्हा सुरळीत होण्याची वाट पाहत आहे. फरहान म्हणाला, सध्या अनेक गोष्टींबाबत खूप अफवा पसरत आहेत. मी नेहमीच या मतावर ठाम राहिलो आहे की, चित्रपट बनवताना मला कोणतीही गोष्ट गुपित ठेवायला आवडत नाही. जेव्हा कधी मला असे वाटते की एखादी गोष्ट जगासमोर मांडण्यासाठी तयार आहे, तेव्हा मी ती सर्वांसोबत शेअर केली आहे. सध्या मी अशा स्थितीत आहे जिथे मला एक दिग्दर्शक म्हणून माझे पुढचे पाऊल काय असावे, याचा विचार करण्याची गरज आहे. कारण गेल्या काही वर्षांत अनेक गोष्टी घडल्या आहेत, ज्यामुळे मला थोडा वेळ थांबून माझे मन नेमके कशात आहे हे पाहणं आवश्यक वाटतं. त्यामुळे, एकदा का हे स्पष्ट झाले की मी स्वतः जगाला त्याबद्दल माहिती देईन.

# '३ इडियट्स'च्या सीक्वलमध्ये विकी?



आमिर खानने नुकतीच याबद्दल माहिती दिली आहे. अभिनेत्याने सांगितलं की दिग्दर्शक राजकुमार हिराणी या चित्रपटाच्या पात्रांवर काम करत आहेत. '३ इडियट्स' हा चित्रपट प्रदर्शित होऊन आता दशकाहून अधिक काळ झाला असला, तरी त्याची लोकप्रियता अजूनही कायम आहे. आता '३ इडियट्स'च्या सीक्वलची कथा त्याला खूप आवडली आहे. या माध्यमानुसार सीक्वलमध्ये विकीच्या पात्रामुळे आमिर आणि इतर मूळ पात्रांबरोबर एक नवीन आणि भावनिक ट्विस्ट येणार आहे.

विकीने आमिरबरोबर काम करण्याची आणि या चित्रपटातील इतर कलाकारांबरोबर स्क्रीन शेअर करण्याबद्दल उत्सुकता व्यक्त केली आहे. विकी, आमिर आणि राजकुमार हिरानी यांच्या यासाठी अनेक भेटीही झाल्याचं म्हटलं जातं. विकीने '३ इडियट्स २' मधील चौथ्या पात्रासाठी होकार दिल्याचं म्हटलं जातं. मात्र, संपूर्ण टीमचं वेळापत्रक जुळल्यानंतरच हा प्रोजेक्ट पुढे जाईल. विकी कौशलचा '३ इडियट्स'च्या सीक्वलमध्ये सहभाग असेल की नाही, याबाबत अजूनही अधिकृत घोषणा झालेली नाही. या बहुचर्चित प्रोजेक्टबद्दल बोलताना आमिर खानने एका मुलाखतीत सांगितलं की '३ इडियट्स'चा सीक्वल जवळपास १० वर्षांनंतरच्या रँचो, फरहान आणि राजू यांच्या आयुष्यावर आधारित असेल. मुलाखतीत आमिरने याबद्दल सांगितलं आहे. अभिनेता म्हणाला, राजू सध्या '३ इडियट्स २'वर काम करत आहे. तो पुढे म्हणाला, स्क्रिप्टवर अजून काम सुरू आहे, पण कथा खूप वेगळी आहे. पहिल्या चित्रपटासारखाच त्यात विनोद असेल आणि ही कथा १० वर्षांनंतरच्या पात्रांचा प्रवास दाखवेल. २००९ मध्ये प्रदर्शित झालेल्या '३ इडियट्स' चित्रपटात आर.माधवन, शर्मन जोशी आणि करीना कपूर यांसारख्या कलाकारांची केमिस्ट्री पाहायला मिळाली होती. त्यामुळे या चित्रपटाच्या सीक्वलमध्ये काय पाहायला मिळणार याबद्दल उत्सुकता असेल.



# 'रीसेट'मध्ये झळकणार प्रियंका

अभिनेत्री बॉलिवूडची 'देसी गर्ल' प्रियंका चोप्रा सध्या हॉलिवूडमध्ये मोठं नाव कमावत आहे. अभिनय, निर्मिती आणि ग्लोबल प्रोजेक्ट्समुळे ती सतत चर्चेत असते. आता प्रियंकाच्या चाहत्यांसाठी आणखी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. प्रियंका लवकरच 'रीसेट' नावाच्या नव्या हॉलिवूड चित्रपटात झळकणार असून या चित्रपटात तिच्यासोबत प्रसिद्ध हॉलिवूड अभिनेता 'ऑरलँडो ब्लूम' दिसणार आहे. 'रीसेट' हा एक सर्व्हायवल थ्रिलर चित्रपट असणार आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन मॅट स्मूकलर करणार आहेत. चित्रपटाबाबतची माहिती समोर आल्यानंतर प्रियंकाने स्वतः तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर ही बातमी शेअर करून चाहत्यांना आनंदाची बातमी दिली. तिच्या पोस्टवर अभिनेत्री दिया मिर्झानेही प्रतिक्रिया दिली आहे. सोशल मीडियावर प्रियंकाच्या चाहत्यांनीही उत्साह व्यक्त करत तिचं अभिनंदन केलं आहे. प्रियंका चोप्रा केवळ अभिनयच नाही तर निर्मिती क्षेत्रातही सक्रिय झाली आहे. विशेष म्हणजे 'रीसेट' या चित्रपटात ती अभिनेत्रीबरोबरच निर्मातीची भूमिकाही निभावणार आहे. त्यामुळे हा प्रोजेक्ट प्रियंकासाठी आणखी खास मानला जात आहे. या चित्रपटाच्या शूटिंगबाबतही महत्त्वाची माहिती समोर आली आहे. रिपोर्टनुसार, 'रीसेट' चित्रपटाचं शूटिंग ऑगस्ट महिन्यात सुरू होण्याची शक्यता आहे. सर्व्हायवल थ्रिलर प्रकारातील हा चित्रपट प्रेक्षकांसाठी एक वेगळा अनुभव ठरणार असल्याचं बोललं जात आहे. प्रियंका चोप्राने गेल्या काही वर्षांत हॉलिवूडमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. 'सिटाडेल' मालिकेपासून अनेक आंतरराष्ट्रीय प्रोजेक्ट्समध्ये तिने दमदार कामगिरी केली आहे. नुकताच तिचा 'सिटाडेल २' हा सीझन प्रदर्शित झाला असून त्यालाही प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. याशिवाय प्रियंका दिग्दर्शक एस. एस. राजामौली यांच्या मोठ्या बजेटच्या 'वाराणसी' या चित्रपटातही काम करत आहे. या चित्रपटात तिच्यासोबत अभिनेता महेश बाबू मुख्य भूमिकेत दिसणार आहे. 'वाराणसी' चित्रपटाचं शूटिंग सध्या सुरू असून हा चित्रपट पुढील वर्षी एप्रिलमध्ये प्रदर्शित होणार असल्याचं सांगितलं जात आहे. प्रियंकाच्या करिअरकडे पाहिल्यास तिने बॉलिवूडपासून हॉलिवूडपर्यंत यशस्वी प्रवास केला आहे. अभिनयासोबतच निर्मिती क्षेत्रातही ती स्वतःची छाप सोडताना दिसत आहे. त्यामुळे 'रीसेट' या नव्या चित्रपटाकडून तिच्या चाहत्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.

# सिद्धार्थसोबत जमणार तमन्नाची जोडी



सिद्धार्थ मल्होत्रा दीर्घकाळापासून स्वत:चा आगामी चित्रपट 'वन-फोर्स ऑफ द फॉरेस्ट'वरून चर्चेत आहे. या चित्रपटात त्याची पहिल्यांदाच तमन्ना भाटियासोबत जोडी जमणार आहे. निर्मात्यांनी या चित्रपटाचे पोस्टर जारी करत याची प्रदर्शनाची तारीख जाहीर केला आहे. हा चित्रपट आता २८ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहे. मध्य भारतच्या घनदाट जंगलांमध्ये चित्रित करण्यात आलेल्या चित्रपटात रोमांच, गुप्त मंदिरे आणि जुन्या कहाण्यांचे मिश्रण पाहता येणार आहे. या चित्रपटाची निर्मिती एकता कपूरने केली आहे. तर दीपक मिश्रा आणि अरुणभ कुमार हे याचे दिग्दर्शक आहेत. या चित्रपटाचे चित्रिकरण खर्‍याखुर्‍या वनक्षेत्रात करण्यात आल्याचे निर्मात्यांकडून सांगण्यात आले आहे. सिद्धार्थ मल्होत्रा यापूर्वी परम सुंदरी या चित्रपटात दिसून आला होता. या चित्रपटात त्याच्या नायिकेची भूमिका जान्हवीने साकारली होती. दिनेश व्हिजनच्या मॅडॉक बॅनर अंतर्गत या चित्रपटाची निर्मिती झाली होती. तर तुषार जलोटा याचे दिग्दर्शक होते. तर तमन्ना ही पुढील काळात आणखी काही चित्रपटांमध्ये मुख्य भूमिकेत दिसून येणार आहे.



# शाहिदसोबत दिसणार जान्हवी

शाहिद कपूर आणि क्रीति सेनॉन ही जोडी लवकरच 'कॉकटेल २ या चित्रपटात दिसून येणार आहे. या चित्रपटात रश्मिका मंदानाही मुख्य भूमिकेत आहे. परंतु शाहिद कपूरच्या आणखी एका चित्रपटाचा सीक्वेल येत असून त्याच्यासोबत यात जान्हवी कपूर ही अभिनेत्री दिसून येणार आहे. शाहिद कपूर लवकरच स्वत:चा साय-फाय रोमँटिक ड्रामा चित्रपट 'तेरी बातों में ऐसा उलझा जियाचा सीक्वेल घेऊन येत आहे. या चित्रपटाच्या पहिल्या भागात प्रेम आणि तंत्रज्ञानाच्या अनोख्या मिश्रणाला प्रेक्षकांनी पसंत केले होते. आता निर्माते या फ्रेंचाइजीला आणखी मोठ्या स्तरावर निर्माण करणार आहेत. शाहिद अन् क्रीति मुख्य भूमिकेत आहे, याचबरोबर या फ्रेंचाइजीत आता जान्हवी कपूरही जोडली जाणार आहे. या चित्रपटाची कहाणी सध्या लिहिली जात आहे. निर्माते पुढील वर्षी याचे चित्रिकरण सुरू करणार आहेत. शाहिद याचबरोबर 'फर्जी २ सीरिजमध्ये काम करत आहे. या सीरिजच्या दुसर्‍या सीझनची प्रेक्षक आतुरतेने प्रतीक्षा करत आहेत.

# 'सिस्टम'मध्ये दिसणार सोनाक्षी

खास सुविधा आणि हक्क गाजवणार्‍या जगात घडणारा 'सिस्टम' हा दमदार न्यायालयीन नाट्यपट प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होतो आहे. न्याय फक्त न्यायालयाच्या निकालात नसतो, तर सत्याला सामोरे जाण्यातही असतो, यावर भाष्य करणारा हा सिनेमा आहे. 'सिस्टम'मध्ये सोनाक्षी सिन्हा, ज्योतिका आणि आशुतोष गोवारिकर प्रमुख भूमिकांमध्ये दमदार अभिनय करताना दिसतील. यांच्यासोबत प्रीती अग्रवाल, अदिनाथ कोठारे, आश्रिया मिश्रा, गौरव पांडेय आणि सायंदीप गुप्ता महत्त्वाच्या भूमिकांमध्ये झळकतील. हा चित्रपट २२ मे रोजी भारतासह जगभरातील २४० हून अधिक देश आणि प्रदेशांमध्ये फक्त प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अश्विनी अय्यर तिवारी यांनी केले आहे. पम्मी बावेजा, हरमन बावेजा आणि स्मिता बालिगा यांनी बावेजा स्टुडिओजच्या बॅनरखाली निर्मिती केली आहे. हरमन बावेजा, अरुण सुकुमार, अश्विनी अय्यर तिवारी, तस्नीम लोखंडवाला आणि अक्षत घिल्डियाल यांनी कथालेखन केले आहे. प्राइम व्हिडिओने आज या चित्रपटाच्या जागतिक प्रदर्शनाची तारीख २२ मे जाहीर केली. हा एक उत्कंठावर्धक न्यायालयीन नाट्यपट असून प्रत्येक टप्प्यावर प्रेक्षकांना आश्चर्यचकित करण्याचे आश्वासन देतो. कथानक एका विशेष सुविधा मिळालेल्या सरकारी वकिलावर आधारित आहे, जी एका सामान्य न्यायालयीन लेखनिकासोबत मिळून दडपलेला अन्याय उघड करण्याचा प्रयत्न करते. या प्रवासात तिला ताकद आणि न्याय यांमध्ये निवड करावी लागते. हा चित्रपट नेहा राजवंश (सोनाक्षी) या सरकारी वकिल आणि सारिका रावत (ज्योतिका) या न्यायालयीन लेखनिक यांच्या अनोख्या नात्याभोवती फिरतो. सारिका सामान्य कुटुंबातून आलेली आहे, तर नेहाचा सामाजिक स्तर वेगळा आहे. तरीही दोघी सत्य आणि न्यायासाठी एकत्र उभ्या राहतात, जरी त्यासाठी त्यांना सर्वात प्रभावशाली लोकांविरुद्ध लढावे लागले तरी.



# सलमानसोबत 'सिनेमात' करीनाची वर्णी?

बॉलिवूडचा 'भाईजान' सलमान खान आणि 'बेबो' करीना कपूर ही जोडी पुन्हा एकदा रुपेरी पडद्यावर एकत्र येण्याची शक्यता आहे. 'बॉडीगार्ड' आणि 'बजरंगी भाईजान' सारख्या सुपरहिट चित्रपटांनंतर, तब्बल ११ वर्षांनी हे दोन सुपरस्टार्स एकत्र झळकणार असल्याची चर्चा आहे.

सलमानने या चित्रपटासाठी स्वतः करीनाशी संपर्क साधला असून तिनेही या भूमिकेत रस दाखवला आहे. सलमानसाठीही हा महत्वाचा प्रोजेक्ट आहे कारण 'द फॅमिली मॅन' फेम दिग्दर्शक जोडी राज आणि डीके या सिनेमाचं दिग्दर्शन करणार आहेत. सलमानच्या या आगामी सिनेमासाठी याआधी साऊथ सुपरस्टार समंथा रुथ प्रभूच्या नावाची चर्चा होती. मात्र आता करीनाचे नाव आघाडीवर आहे. जर सिनेमात करीनाची एन्ट्री झाली तर सलमान आणि करीना पाचव्यांदा स्क्रीन शेअर करतील. यापूर्वी त्यांनी 'क्यों की...', 'मैं और मिसेस खन्ना', 'बॉडीगार्ड' आणि २०१५ मध्ये 'बजरंगी भाईजान' या चित्रपटांमध्ये काम केले आहे. २०१५ नंतर ही जोडी परत दिसली नव्हती. ११ वर्षांनी त्यांना पुन्हा एकत्र पाहण्यासाठी चाहतेही उत्सुक आहेत. या चित्रपटाचे कथानक अतिशय रंजक असून सलमान खान यात एका वयस्कर सुपरहीरोची भूमिका साकारताना दिसणार आहे. अनपेक्षित परिस्थितीमुळे त्याला पुन्हा एकदा क्शनमध्ये परतावे लागते आणि तो एका मोठ्या संघर्षात अडकतो, अशी या चित्रपटाची ढोबळ कथा असेल. अतुल अग्निहोत्री आणि मैत्री मुव्ही मेकर्स या चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. या नव्या प्रयोगात सलमानला सुपरहीरोच्या अवतारात पाहणे प्रेक्षकांसाठी पर्वणीच ठरणार आहे.

'द फॅमिली मॅन', 'फर्जी' आणि 'गन्स अँड गुलाब्स' सारख्या सुपरहिट ओटीटी सीरिज देणारी राज आणि डीके ही जोडी या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहे. २०१७ मधील 'ए जेंटलमैन' नंतर या दिग्दर्शक जोडीचा हा मोठा सिनेमॅटिक कमबॅक असेल. ओटीटीवर यश मिळवल्यानंतर राज आणि डीके आता सलमान खानसोबत मोठ्या पडद्यावर काय जादू करतात, याकडे संपूर्ण चित्रपटसृष्टीचे लक्ष लागले आहे.





# राम चरण-जान्हवीच्या 'पेड्डी'चं पोस्टर रिलीज

राम चरणचा 'पेड्डी' सिनेमा २०२६ मधील सर्वात बहुप्रतीक्षित चित्रपटांपैकी एक आहे. जान्हवी कपूर आणि जगपति बाबू यांसारख्या दमदार कलाकारांसह, पोस्टर्सपासून गाण्यांपर्यंत प्रत्येक अपडेटने प्रेक्षकांची उत्सुकता वाढवली आहे. निर्मात्यांनी आता एक दमदार नवीन पोस्टर प्रदर्शित केलं आहे. ४ जूनला प्रदर्शित होणार आहे. या सिनेमाच्या नव्या पोस्टरमध्ये राम चरण हातात बिडी घेऊन निवांत बसल्याचं दिसत आहे. चित्रपटातील त्याच्या या नव्या लूकची झलक चाहत्यांना पाहायला मिळाली आहे. या पोस्टरवर सिनेमा प्रदर्शित होण्यासाठी ३० दिवस बाकी असल्याचं म्हटलं आहे. 'पेड्डी' सिनेमातील गाण्यांनी चाहत्यांना भुरळ पडली आहे. चित्रपटातील पहिले गाणे चिकिरी चिकिरी ए. आर. रहमान यांच्या खास टचसह प्रदर्शित होताच प्रेक्षकांच्या मनात घर करून गेले. या गाण्याने सर्व प्लॅटफॉर्म्सवर २०० मिलियन व्ह्यूजचा टप्पा पार केला आहे. त्यानंतर राई राई रा रा या गाण्यालाही प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. त्यातील हाय-एनर्जी बीट्स आणि उत्कृष्ट कोरिओग्राफीला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. या गाण्याने यूट्यूबवर ६५ मिलियन व्ह्यूजचा टप्पा ओलांडला असून, 'पेड्डी'बद्दलची चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे. बुची बाबू साना लिखित आणि दिग्दर्शित 'पेड्डी'मध्ये राम चरण मुख्य भूमिकेत असून त्यांच्यासोबत शिवा राजकुमार, जान्हवी कपूर, दिव्येंदु शर्मा आणि जगपति बाबू देखील दिसणार आहेत. वेंकट सतीश किलारू यांनी 'वृद्धि सिनेमाज'च्या बॅनरखाली याची निर्मिती केली आहे आणि 'माइथ्री मूवी मेकर्स'च्या सहकार्याने हा चित्रपट साकारला आहे. हा चित्रपट ४ जून २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.

# मराठमोळी अभिनेत्री गाजवणार दाक्षिणात्य इंडस्ट्री!



अभिनेत्री मराठमोळ्या सौंदर्याचा डंका आता दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत वाजणार आहे. साऊथचा सुपरस्टार शिवकार्तिकेयनच्या आगामी 'सेयोन' या चित्रपटाबाबत प्रेक्षकांमध्ये आधीच प्रचंड उत्सुकता होती, आता त्यात एका मराठमोळ्या अभिनेत्रीची एन्ट्री झाली आहे. ही अभिनेत्री छत्रपती संभाजीनगरची असून मराठी कुटुंबात जन्माला आली आहे. तर ती आहे भाग्यश्री बोरसे. भाग्यश्रीच्या वाढदिवसाचे औचित्य साधून 'सेयोन'च्या निर्मात्यांनी तिचा चित्रपटातील फर्स्ट लुक पोस्टर रिलीज केले आहे. रिलीज करण्यात आलेल्या पोस्टरमध्ये भाग्यश्री अतिशय साध्या, शांत आणि तितक्याच प्रभावी लूकमध्ये दिसत आहे. तिच्या हातात एक मोरपिस असून तिच्या डोळ्यांतील निरागसतेने चाहत्यांना भुरळ घातली. सेयोन' हा एक तमिळ ॲक्शन-ड्रामा चित्रपट असून, याचे दिग्दर्शन सिवकुमार मुरुगेशन करत आहेत. विशेष म्हणजे, या चित्रपटाची निर्मिती अभिनेते कमल हसन यांच्या 'राज कमल फिल्म्स इंटरनॅशनल' या बॅनरखाली केली जात आहे. या चित्रपटात शिवकार्तिकेयन एका माजी सैनिकाच्या भूमिकेत दिसणार आहे, जो नंतर समाजसेवक बनतो. या चित्रपटासाठी शिवकार्तिकेयनला तब्बल ६५ कोटी रुपये मानधन देण्यात आले आहे. हा चित्रपट ऑक्टोबर २०२६ मध्ये जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. मूळची महाराष्ट्राची असलेल्या भाग्यश्रीसाठी हा दुसरा तमिळ चित्रपट ठरणार आहे. याआधी ती 'कांथा' या चित्रपटात झळकली होती. भाग्यश्रीचा जन्म १९९९ साली छत्रपती संभाजीनगरमध्ये झाला. भाग्यश्रीच्या जन्मानंतर काही वर्षात तिचं कुटुंब नायजेरियाला शिफ्ट झालं. तिथे तिच्या वडिलांना नोकरी मिळाली. 'लेगोज'शहरात तिने शालेय शिक्षण घेतलं. सात वर्ष नायजेरियात राहिल्यानंतर ती मुंबईत आली. इथे तिने बिझनेस मॅनेजमेंटमध्ये पदवी घेतली. शिक्षण घेतानाच ती मॉडेलिंगही करत होती. तिचा कॅमेरा प्रेझेन्स चांगला असल्याने अनेकांनी तिला अभिनय क्षेत्रात येण्याचा सल्ला दिला. हिंदीत नशीब आजमावल्यानंतर भाग्यश्री साऊथमध्ये शिफ्ट झाली.

# त्रिशा कृष्णनची राजकारणात एन्ट्री?



सध्या तामिळनाडूच्या राजकारणातील प्रभावी व्यक्ती म्हणून टीव्हीकेचे सर्वेसर्वा आणि मुख्यमंत्री थलपती विजय यांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्या टीव्हीके पक्षाने विधानसभा निवडणुकीत अभूतपूर्व यश मिळवत तब्बल १०८ जागांवर विजय मिळवला. अशातच विजयची कथित गर्लफेंड अभिनेत्री त्रिशा कृष्णन राजकारणात एन्ट्री करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. एका न्यूज वाहिनीने दिलेल्या वृत्तानुसार, अभिनेत्री त्रिशा कृष्णन देखील विजयच्या टीव्हीके या पक्षात सामील होणार आहे. तामिळनाडूतील तिरुचिरापल्ली पूर्व मतदारसंघातून तिने पोटनिवडणूक लढवावी आणि विजयप्रमाणे सक्रीय राजकारणात प्रवेश करावा असे बोलले जात आहे. विजयने या निवडणुकीत दोन मतदार संघात विजय मिळवला आहे. पेरंबूर आणि तिरुचिरापल्ली पूर्व असे दोन मतदार संघ आहेत. नियमानुसार १४ दिवसांच्या आता यापैकी एका जागेचा राजीनामा द्यावा लागतो. त्यानंतर संबंधित विधानसभेची जागा रिक्त होईल आणि पोटनिवडणुकीची घोषणा केली जाईल. माध्यमांनी दिलेल्या बातम्यांनुसार,विजयला पेरांबूर येथून चांगले मताधिक्य मिळाले आहे. त्यामुळे विजय तिरुचिरापल्ली पूर्व जागेवरून राजीनामा देऊ शकतो, अशी चर्चा आहे. ही जागा रिक्त झाली तर पोटनिवडणुकीसाठी अभिनेत्री त्रिशा कृष्णनचे नाव पुढे आले आहे. मात्र, अभिनेत्रीने याबाबत अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही. दरम्यान, विजय आणि त्रिशा यांच्या डेटिंगच्या चर्चा होत आहेत. मात्र, यावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.


# देवरकोंडाच्या नव्या चित्रपटाची घोषणा



दाक्षिणात्य अभिनेता विजय देवरकेंडाने नव्या चित्रपटाची घोषणा केली आहे. याचे नाव सध्या व्हीडीएक्स शौर्यव ठेवण्यात आले आहे. हा चित्रपट विजयने शौर्यवसोबत मिळून तयार केला आहे, शौर्यवला 'हाय नाना'साठी ओळखले जाते. विजयने एक पोस्ट करत या चित्रपटाच्या टीमची ओळख स्वतःच्या चाहत्यांना करून दिली आहे. या घोषणेच्या पोस्टरमध्ये विजय दिसून येत आहे. हा प्रोजेक्ट एका पौराणिक कहाणीवर आधारित असावा, यामुळे तो आंतरराष्ट्रीय स्तराच्या निर्मात्यांसोबत निर्माण केला जात आहे. या चित्रपटात एक आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची टीम जोडली गेली असून यात सिनेमॅटोग्राफर अलेजांद्रो मार्टिनेज सामील आहेत. त्यांना 'हाउस ऑफ द ड्रॅगन'मधील स्वतःच्या कामासाठी ओळखले जाते. तर एक व्हीएफएक्स टीम असून ती यापूर्वी 'स्नोपियर्सर' आणि 'बॅटमॅन फॉरएव्हर' यासारख्या चित्रपटांशी जोडलेली राहिली आहे. चित्रपटाला संगीत हेशम अब्दुल वहाब देणार आहेत. विजय याचबरोबर 'रणबाली'वर काम करत असून त्याचे दिग्दर्शन राहुल सांकृत्यानकडून केले जात आहे. हा चित्रपट एक ऐतिहासिक ॲक्शन ड्रामा आहे. १८५४-१८७८ दरम्यानच्या पार्श्वभूमीवर निर्मित या चित्रपटात रश्मिका मुख्य भूमिकेत आहे. हॉलिवूड अभिनेता अर्नोल्ड वोस्लू यात खलनायकाच्या भूमिकेत आहे.

# पूजा सावंत दिसणार नव्या चित्रपटात

मराठमोळी अभिनेत्री पूजा सावंत नव्या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. 'दृश्य-अदृश्य' या तिच्या आगामी सिनेमाचे पोस्टर अलिकडेच प्रदर्शित झाले. पोस्टरमध्ये पूजाच्या नजरेतला गोंधळ, भीती आणि शोध 'दृश्य-अदृश्य'च्या कथानकाचा गाभा अधोरेखित करते. तिच्या मागे पोलिसी वेशात अशोक समर्थ पाहायला मिळत आहे. या सिनेमाविषयी पूजा म्हणाली, 'दृश्य-अदृश्य' हा माझ्यासाठी केवळ एक सिनेमा नाही, तर माझ्या आतला प्रवास आहे. आपण जे पाहतो, त्यावर सहज विश्वास ठेवतो, पण या कथेनं मला शिकवलं, की प्रत्येक सत्याच्या मागे काहीतरी दडलेलं असतं, जे सहसा दिसत नाही. प्रेक्षक हा चित्रपट पाहतील, तेव्हा ते स्वतःच्या अनुभवांशीही जोडले जातील. कदाचित त्या क्षणी 'दृश्य' आणि 'अदृश्य' यांच्यातली रेषा त्यांच्यासाठीही धूसर होईल.' आरएसटी कॅनव्हास निर्मित या सस्पेन्स थ्रिलरचं दिग्दर्शन मिलिंद लेले यांनी केलं आहे, तसेच कथा-पटकथाही त्यांनीच लिहिली आहे. पूजासोबत सिनेमात अशोक समर्थ, सुव्रत जोशी, हार्दिक जोशी, अक्षया गुरव, विद्याधर जोशी आणि केया इंगळे आदी कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. येत्या १९ जून रोजी हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे.



# 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम अभिनेत्रीचे बॉलीवूडमध्ये पदार्पण



बॉलिवूडचा 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या लोकप्रिय शोमुळे ईशा डे हिला नवी ओळख मिळाली. यानंतर आता ईशाला मोठे यश मिळाले आहे. ईशा डेची अभिनेत्री कंगनाच्या हिंदी सिनेमामध्ये वर्णी लागली आहे. यामुळे आता तिला बॉलीवूडमध्ये पदार्पण करण्याची मोठी संधी मिळाली आहे. याबाबत तिने आनंद व्यक्त करत चाहत्यांसोबत ही माहिती शेअर केली आहे. ईशाने तिच्या आगामी सिनेमाबद्दलची पोस्ट इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे. ईशा डे कंगनासोबत 'भारत भाग्य विधाता' या सिनेमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. पोस्टमध्ये ईशा डेनं लिहिलं की, 'मोठ्या पडद्यावर झळकण्याचं स्वप्न पूर्ण झालंमाझ्या पहिल्या हिंदी सिनेमाची घोषणा करताना खूप आनंद होतोय.' तसेच ईशा डेला मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी प्रेक्षकांचीही उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. 'भारत भाग्य विधाता' या सिनेमाची निर्मिती कंगना रणावतच्या 'मणिकर्णिका फिल्म्स' या प्रोडक्शनने केली असून सिनेमाचं दिग्दर्शन आणि लेखन मनोज तपाडिया यांनी केलं आहे. 'भारत भाग्य विधाता' हा सिनेमा १२ जून रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. ईशासोबत या सिनेमात गिरिजा ओक, स्मिता तांबे, प्रसाद ओक यांसारखे मराठी कलाकारही झळकणार आहेत. ईशाच्या कामाबद्दल सांगायचं झाले तर, तिला 'गुलकंद' या सिनेमासाठी 'झी मराठी चित्र गौरव २०२६'चा सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेत्रीचा पुरस्कारही मिळाला आहे. यानंतर आता तिची बॉलीवूडमधील नव्या चित्रपटात कोणती भूमिका असणार? याबाबतही उत्सुकता वाढली आहे.

# 'तुंबाड २' मध्ये झळकणार आलिया



आलिया भट्ट बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. येत्या काळात ती 'लव्ह अँड वॉर' आणि 'अल्फा' या दोन चित्रपटांतून झळकणार आहे, पण अशातच आता आलिया अजून एका बहुप्रतीक्षित चित्रपटात झळकणार असल्याची चर्चा आहे. आलियाच्या अभिनयाचं आतापर्यंत अनेकांनी कौतुक केले आहे. तिच्या प्रत्येक भूमिकेला चाहत्यांचा खूप चांगला प्रतिसाद मिळतो. अशातच आता अभिनेत्री एका आगळ्या वेगळ्या भूमिकेतून प्रेक्षकांसमोर येण्याची शक्यता आहे. ही बातमी खरी असेल तर आलियाला अशा थ्रिलर चित्रपटातून पाहणं तिच्या चाहत्यांसाठी सुखद धक्का असेल.

आलियाचं नाव 'तुंबाड २' चित्रपटाशी जोडलं जात आहे. अभिनेत्री या चित्रपटाच्या सीक्वलमध्ये झळकणार असल्याची चर्चा आहे. वृत्तानुसार सोहम शाह हे गेल्या काही काळापासून त्यांच्या आगामी 'तुंबाड २' या चित्रपटामुळे चर्चेत आहेत. या हॉरर चित्रपटात अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी मुख्य भूमिकेत दिसणार आहे. २०१८ मध्ये आलेल्या 'तुंबाड' या चित्रपटाच्या सीक्वलमध्ये आता बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्टची एन्ट्री झाली आहे. या चित्रपटासाठी मेकर्सना मोठ्या फीमेल स्टारची गरज होती आणि आता आलियाच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याचं म्हटलं जातंय. रिपोर्टनुसार, ती या चित्रपटात दमदार कॅमिओ करणार आहे. जरी तिचा स्क्रीन टाइम कमी असला तरी कथेत तिची भूमिका खूप महत्त्वाची असणार आहे. माध्यमांच्या वृत्तानुसार, मेकर्सना असा कलाकार हवा होता, जो कमी वेळातही आपल्या उपस्थितीने प्रभाव आणि रहस्य निर्माण करू शकेल. या भूमिकेसाठी आलिया अगदी योग्य आहे. अलीकडेच 'तुंबाड २' ची रिलीज डेट जाहीर करण्यात आली आहे. हा चित्रपट ३ डिसेंबर २०२७ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. 'तुंबाड' हा चित्रपट २०१८ मध्ये प्रदर्शित झाला होता आणि हळूहळू या चित्रपटाने अनेकांची पसंती मिळवली. २०२४ मध्ये तो पुन्हा थिएटरमध्ये रिलीज करण्यात आला आणि त्याला चांगला प्रतिसाद मिळाला.



# सर्जनशील अभिनेत्री: स्मिता पाटील

**सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या तुझेच मी गीत गात आहे...' १९८२ सालच्या 'उंबरठा' सिनेमातील वरील गाण्यात सामाजिक दायित्वाच्या निर्धारात कितीही वाहून घेतले तरीही मनात पिंगा घालणाऱ्या पूर्वायुष्यातील नवरा व मुलासोबतच्या सुखद आठवणी नकळत विरहाची जाणीव देतात. घेतलेल्या निर्णयाच्या चुकीच्या आभासानेही डोळे पाणावतात. अश्रू गालावर कधीही घरंगळतील या अवस्थेतील अभिनय स्मिताने अभिनयाच्या साऱ्या सीमा ओलांडून सादर केला.**

१९५८' 'गगन सदन तेजोमय तिमिर हरून करुणाकर' वरील चित्रपटात वसंत बापट यांच्या या प्रार्थना गीतातील शब्दप्रभुत्वाने व स्मिताच्या पडद्यावरील अस्तित्वाने या गीतातील प्रसंगाला वेगळ्याच पातळीवर नेऊन ठेवले. 'जांभुळ पिकल्या झाडाखाली ढोल कुणाचा वाज जी...' १९७७ सालच्या 'जैत रे जैत' चित्रपटातील कविराज ना. धों. महानोर यांचे ठाकर जमातीच्या बेफिकीर वृत्तीच्या व उघड्या मैदानावर अर्धवट उघड्या अंगाने वावरणाऱ्या जनजातीच्या जीवनावरील हे अजरामर गीत लोकगीताचा बाज असून स्मिता पाटील (चिंधी) या आदिवासी महिलेवर केंद्रित आहे. ठाकरी वेशभूषेत स्मिता यांचा अभिनय अगदी साजेसा खुलून दिसला.

स्मिता त्यांच्या हातात काटक्याची मोळी घेऊन मनातील विचारांचे ओझे घेऊन साधा वाट तुडविण्याचा अभिनयही बाजी मारून गेला. 'मी रात टाकली मी कात टाकली...' 'जैत रे जैत'मधील या गाण्यात 'मुडक्या संसाराची'सारख्या शब्दांची पेरणी करण्यात महानोर वाकबगार आहेत. ठाकरी पेहरावात स्वच्छंदपणे ओढ्यातील पाण्याची मजा घेत खुल्या मैदानात पहडून स्मिता म्हणतात... 'या पंखावरती मी नभ पांघरती मी मस्त मोरनी चांदण्यात न्हाती...' निसर्गात रममाण होऊन गाण्याचा आनंद स्मिता यांनी करून दिला. 'मेरे ग्राम कथा परे जा दूध की नदिया बहे जा...' १९७६ सालच्या हिंदी 'मंथन' चित्रपटात दूध माफियांनी केलेल्या बंडखोरीला विरोध करणारी बिंदू नावाच्या बंडखोर स्त्रीची भूमिका अफलातून सादर केली. केवळ २० वर्षांच्या वयात स्मिता यांचा अभिनय मैलाचा दगड ठरला. श्याम बेनेगल यांची निवड योग्य ठरली. 'तुम्हारे बिन जी न लगे घरमे बलमजी तुमसे...' १९७७ सालच्या 'भूमिका' चित्रपटातले प्रीतिसागर यांच्या मदभऱ्या आवाजातील ही विरहिनी स्मिता यांनी संयमित आविर्भावात व्यक्तिरेखेला अनुरूप शारीरिक हालचाली व अर्थवाही संगीताला योग्य न्याय देऊन सहज साकारली. १९८० सालच्या 'आक्रोश' सिनेमाद्वारे विजय तेंडुलकर यांच्या पटकथेवर व गोविंद निहलानी यांच्या निर्देशनात स्मिता पाटील यांनी अभिनयाचे सर्व रेकॉर्ड मोडले. मानवी नातेसंबंधाच्या अनेक कोनातून विचार करून प्रत्येक कंगोरा आपल्या अभिनयातून उलगडून त्यांनी नगीना नामे आदिवासी पीडित महिला, तिच्यावरील होणारे उत्पीडन, अन्यायग्रस्थ अवस्था, सामाजिक विषमता, स्त्री शोषण व स्त्रीची असहायता यांचे यथार्थ दर्शन अभिनित करून भेदक नेत्रातून आक्रोश प्रकट करून सर्वांना चकित केले.

'काले काले गहरे साये हो सके दूर वो आहे' १९८१ सालच्या 'चक्र' सिनेमात, झोपडपट्टीतील अंधारात कधीतरी आशेचा किरण पडेल व तिमिराचा नाश होईल, याचे दिवास्वप्न रंगविताना स्मिता यांचा आशावादी अभिनय खूप काही सांगून जातो. प्रत्येक फ्रेममध्ये स्मिता यांच्या अभिनयाला वैचारिक डूब जाणवते. सिनेमातील स्त्री पात्राकडे कधीही वस्तुस्वरूप कवा त्याच प्रसंगासाठी अभिनय असा न करता स्त्री-पुरुष नात्यातील गुंतागुंतीच चित्रच साकार करायच्या. 'जबाने बदलते है हर आन खुबा...' १९८३ सालच्या 'मंडी' चित्रपटात वेश्यालयातील शास्त्रीय गायिका असलेल्या झिनत नामे वेश्येच्या भूमिकेतील हा मुजरा ग्राहकांसमोर सादर करताना, वेश्येच्या अवतारातील समर्पक हावभाव पेश करून याही भूमिकेतील विविध कंगोरे बीभत्स न होता चपखल अभिनित केले. दौलत जादाचा स्वीकारही चतुर अदाकारीने सादर करून बहुआयामित्व सिद्ध केले.

१९८३ सालच्या 'अर्धसत्य' चित्रपटात इमानदार पोलिस इन्स्पेक्टर ओम पुरीचा संघर्ष व भ्रष्ट व्यवस्थेविरुद्ध त्याचे नैतिक द्वंद्व याने प्रभावित होणार्या ज्योत्स्ना गोखले हे पात्र साकारताना ओम पुरीच्या जीवनातील गुंतागुंत समजून घेऊन त्यांना वेळोवेळी भावनिक आधार व धीर देताना कसदार अभिनयाची साक्ष पटते. 'दुनिया में कितना गम है मेरा गम कितना कम है...' १९८६ सालच्या 'अमृत' सिनेमात कौटुंबिक भावनिक नात्याची वीण स्मिता यांनी कौशल्याने विणली. या चित्रपटात राजेश खन्ना व स्मिता पाटील यांच्या अभिनयाची जुगलबंदी पाहावयास मिळते. 'आज रपट जाये तो हमे ना उठइयों' गंभीर सोज्वळ व अन्यायाविरुद्ध लढणारी स्त्री अशी प्रतिमा प्राप्त करणाऱ्या स्मिता यांनी १९८२ सालच्या 'नमक हलाल' चित्रपटात पूनम नामे अमिताभ बच्चन यांच्या प्रेयसीचा आगळा वेगळा व लक्षात राहणारा व्यावसायिक रोल उत्कृष्टपणे साकारला. मुळातच त्या अभिनय मूर्ती होत्या. असे ऐकिवात आहे की, हा रोल करताना त्या अस्वस्थ असत. गाण्याच्या चित्रीकरणानंतर त्या रडल्या होत्या. स्मिता शिवाजीराव पाटील यांचा जन्म १७ ऑक्टोबर १९५५ रोजी पुणे येथे झाला. मुंबईत साहित्याचे शिक्षण घेतले. मुंबईत महिला केंद्राच्या सदस्य होत्या. त्या सक्रिय स्त्रीवादी होत्या. पुण्यात एफ.टी.आय.आय.मध्ये बराच काळ घालवला. सेवादलात कल्चरल ॲक्टिव्हिटीत सक्रिय होत्या. मुंबई दूरदर्शनवर वृत्त वाचक म्हणून काम केले. अरुण खोपकर यांच्या एफ.टी.आय.आय.मध्ये विद्यार्थी चित्रपट 'तीव्र माध्यम'मध्ये काम केले. श्याम बेनेगल यांनी हेरले व १९७४ च्या 'चरणदास चोर' या बालचित्रपटात डेब्यू केला. पहिली प्रमुख भूमिका 'मंथन' या १९७४ च्या चित्रपटात होती. १२ वर्षांच्या काळात हिंदी व मराठी मिळून ८० च्या वर चित्रपट केले. त्यांना दोन राष्ट्रीय पुरस्कार व एक फिल्म फेअर पुरस्कार हिंदीतील योगदानासाठी व दोन फिल्म फेअर महाराष्ट्र राज्य मराठी पुरस्कार तसेच भारत सरकारतर्फे पद्मश्री पुरस्कार प्राप्त झाला. चित्रपटसृष्टीत महत्त्वाचे योगदान देणार्या स्मिता पाटील यांचा राज बब्बरसोबतचा संसार, एक अपत्य प्रतीक याच्या जन्मानंतर स्मिता यांचा १३ डिसेंबर १९८६ रोजी झालेल्या अकाली निधनाने अर्धाच राहिला, हे मात्र पूर्णसत्य होते.

**रमेश पोफळी**



# सचिन पिळगांवकरांनी केलं रणवीरचं कौतुक!

'एकापेक्षा एक' या डान्स शोद्वारे लोकप्रिय अभिनेते, दिग्दर्शक सचिन पिळगांवकर यांनी अनेक स्पर्धकांना मार्गदर्शन केलं. या कार्यक्रमामध्ये त्यांनी मुख्य परीक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली होती. एखाद्या स्पर्धकाने सादर केलेला परफॉर्मन्स त्यांना खूप जास्त आवडला की, सचिन पिळगांवकर आशीर्वाद म्हणून या स्पर्धकाला बक्षीस द्यायचे. आजच्या काळात असं बक्षीस तुम्हाला कोणत्या बॉलीवूड अभिनेत्याला द्यायला आवडेल? असा प्रश्न त्यांना नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत विचारण्यात आला. यावेळी सचिन पिळगांवकरांनी रणवीर सिंहचं नाव घेतलं. 'धुरंधर' सिनेमाच्या दोन्ही भागांमुळे सध्या रणवीर प्रचंड चर्चेत आहे. मनोरंजन विश्वातील अनेक दिग्गज मंडळींनी त्याचं कौतुक केलं आहे. आता सचिन पिळगांवकरांनी सुद्धा रणवीरच्या 'धुरंधर'मधील भूमिकेचं कौतुक करत त्याचा '८३' सिनेमाही मला खूप आवडला होता, असं या मुलाखतीत सांगितलं. सचिन पिळगांवकर म्हणाले, रणवीर सिंहचा अभिनय मला '८३' चित्रपटात खूप जास्त आवडला. मला रणवीर एक अभिनेता म्हणून खूप जास्त आवडतो. कारण, तो त्याच्या प्रत्येक भूमिकेत अगदी समरसून जातो. त्याची ही सवय मला फार आवडते, आणि जे कलाकार अशाप्रकारे एखाद्या भूमिकेत अगदी समरसून जातात आणि परफॉर्म करतातअसे सगळेच कलाकार मला खूप जास्त आवडतात. तो जेव्हा कधी मला भेटेलतेव्हा मी त्याला नक्की बक्षीस देईन. मला 'धुरंधर'मध्येही त्याचं काम खूप जास्त आवडलं. अभिनेते पुढे म्हणाले, धुरंधरमध्ये सर्वांना अक्षय खन्ना जास्त आवडला. अर्थातच अक्षयने छान काम केलं. पण, धुरंधरच्या पहिल्या भागात रणवीरने साकारलेल्या भूमिकेवर मर्यादा होत्या त्याला आपली ओळख रिव्हिल करायची नव्हती. प्रत्येक गोष्टीत ती ओळख लपवून, रागातही स्वत:ला कंट्रोल करण तो जो काही अभिनय रणवीरने केलाय, त्यासाठी त्याचं खूप कौतुक आहे.

# ‘स्पिरिट’ची रिलीज डेट झाली जाहीर




प्रभासच्या 'स्पिरिट' या चित्रपटाबाबत एक मोठी बातमी समोर येत आहे. अखेर 'स्पिरिट' या चित्रपटाची रिलीज डेट समोर आली आहे. काहीच दिवसांपूर्वी आलेल्या पोस्टर आणि ऑडियो टीझरने 'स्पिरिट' चित्रपटाची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. अशातच 'स्पिरिट' चित्रपटाच्या रिलीज डेट बद्दल मोठी माहिती समोर आली आहे.

दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा यांनी सुरुवातीला 'स्पिरिट' हा चित्रपट ५ मार्च २०२७ रोजी ईदच्या मुहूर्तावर प्रदर्शित करण्याची घोषणा झाली आहे. 'स्पिरिट'ची रिलीज डेट पुढे ढकलली जाणार अशी चर्चा होती. परंतु हा सिनेमा ठरलेल्या तारखेलाच म्हणजेच ५ मार्च २०२७ ला रिलीज होणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळे प्रभासच्या चाहत्यांना चांगलाच आनंद झाला आहे. मीडिया रिपोर्टनुसार, संदीप रेड्डी वांगा आता 'स्पिरिट' १ डिसेंबर २०२७ रोजी प्रदर्शित करण्याची रणनीती आखत होते. ही तारीख त्यांच्यासाठी लकी मानली जात आहे, कारण २०२३ मध्ये याच तारखेला रणबीर कपूरचा ब्लॉकबस्टर 'ॲनिमल' चित्रपट प्रदर्शित झाला होता. 'स्पिरिट' चित्रपट सुरुवातीला त्यातील कलाकारांमुळे चर्चेत होता. या चित्रपटात आधी दीपिका पादुकोण मुख्य भूमिकेत होती, परंतु निर्मात्यांशी झालेल्या वादामुळे आता तिच्या जागी तृप्ती डिमरीची वर्णी लागली आहे. सध्या संदीप रेड्डी वांगा या चित्रपटाच्या बॅकग्राउंड स्कोरवर काम करत असून त्याचा फर्स्ट लूक पोस्टर आधीच प्रदर्शित झाला आहे.

# कृतिचा ‘कॉकटेल २’मध्ये ग्लॅमरस अवतार

बॉलीवूड अभिनेत्री कृती सेनन सध्या तिच्या आगामी 'कॉकटेल २' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाच्या रिलीजपूर्वीच कृतीने सोशल मीडियावर आपला ग्लॅमरस अवतार शेअर केला असून त्याने इंटरनेटवर धुमाकूळ घातला आहे. कृतीने इन्स्टाग्रामवर काही खास फोटो शेअर केले आहेत. हे फोटो 'कॉकटेल २'च्या शूटिंगदरम्यानचे असून, त्यामध्ये ती 'एली' या तिच्या पात्रात दिसत आहे. या लुकमध्ये ती खूपच बोल्ड आणि स्टायलिश दिसत आहे. तिचा हा अंदाज पाहून चाहत्यांनी तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. तिच्या या स्टाईल आणि एक्स्प्रेशनमुळे गाण्याबद्दलही प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे. कृतीने फोटो शेअर करताना कॅप्शनमध्ये लिहिलं, ब्रॉन्झ्ड बेबीला कॉकटेल्स हव्यात २ प्लीज, आणि 'एली' हा हॅशटॅग वापरला. यावरून तिच्या पात्राची झलक मिळते. 'एली' हा बिंदास, बोल्ड आणि मोकळा स्वभाव असलेला कॅरेक्टर आहे, जो कृतीने याआधी कधीच साकारलेला नाही. फोटो पोस्ट होताच काही तासांतच लाखो लाईक्स आणि हजारो कमेंट्स आल्या. 'कॉकटेल २' हा २०१२ मध्ये आलेल्या 'कॉकटेल' या चित्रपटाचा सिक्वेल आहे. पहिल्या भागात सैफ अली खान, दीपिका पादुकोण आणि डायना पेंटी मुख्य भूमिकेत होते. त्या चित्रपटाला प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला होता. या नव्या भागात कृती सेननसोबत शाहिद कपूर आणि रश्मिका मंदाना हे कलाकारही महत्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. तिन्ही कलाकारांची केमिस्ट्री आणि कथा प्रेक्षकांना किती आवडते, हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे. एकूणच, 'कॉकटेल २'च्या रिलीजपूर्वीच कृतीचा हा ग्लॅमरस लुक सोशल मीडियावर ट्रेंड होत आहे. तिच्या 'एली' या पात्रामुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली असून, हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर काय कमाल करतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# ‘या’ गाण्यासाठी नोराचा माफीनामा



बॉलिवूड डान्सर व मॉडेल नोरा फतेही ही तिच्या दिलखेचक अदा आणि दमदार नृत्याने नेहमीच चर्चेत असते. अनेक सुपरहिट गाण्यांमधून तिने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. मात्र 'केडी द डेव्हिल' या चित्रपटातील 'सरके चुनर' गाण्यामुळे नोरा वादाच्या भोवर्यात अडकली. अतिशय अश्लील गीत असलेल्या या गाण्यावर चौफेर टीका झाल्यानंतर नोरा फतेही राष्ट्रीय महिला आयोगासमोर उत्तर देण्यासाठी आली आहे. वादग्रस्त गाण्यामुळे निर्माण झालेल्या वादाला नोराला सामोरे जावे लागणार आहे. या चित्रपटातील 'सरके चुनर' गाण्यावरून समाजामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली. या गाण्यातील शब्दांवर आक्षेप घेऊन, अश्लीलतेचा कळस गाठल्याची टीका करण्यात आली होती. त्याची राष्ट्रीय महिला आयोगाने याची दखल घेतली. संबंधित कलाकारांना याबाबत स्पष्टीकरण द्यावे लागणार आहे. यामध्ये अभिनेता संजय दत्त याचादेखील समावेश आहे. आता नोरा फतेही हिनेदेखील महिला आयोगासमोर तिची बाजू मांडली आहे. तसेच घडलेल्या प्रकाराबद्दल माफी मागितली आहे. 'सरके चुनर' या वादग्रस्त गाण्याच्या प्रकरणावर राष्ट्रीय महिला आयोगाने एक सुनावणी ठेवली. या संदर्भात अभिनेत्री नोरा फतेही हिला समन्स बजावण्यात आले असून ती आयोगासमोर उपस्थित राहिली आहे. याआधी झालेल्या सुनावणीच्या वेळी नोरा परदेशामध्ये असल्यामुळे अनुपस्थित होती. त्यावेळी नवीन तारीख देण्याची मागणी नोराने केली होती. सरके चुनर या गाण्यावरुन पार पडलेल्या सुनावणीमध्ये नोरा फतेही हिने माफीनामा दिला. तसेच कोणाच्याही भावना दुखावण्याचा हेतू नसल्याचे देखील ती म्हणाली आहे. नोरा फतेही म्हणाली, मी आयोगाची माफी मागितली आहे. एक कलाकार म्हणून मला माझी जबाबदारी समजली पाहिजे. हे लक्षात घेऊन, मी काही अनाथ मुलींच्या शिक्षणाचा खर्च उचलण्याचा निर्णय घेतला आहे. नोरा फतेही हिने सरके चुनर या गाण्याच्या वादामधून स्वतःला अलिप्त ठेवले होते. तिने चित्रित केलेले गाणे कन्नड होते आणि त्याचे हिंदीमध्ये डबिंग करताना तिची कोणतीही परवानगी घेण्यात आली नव्हती. तसेच या गाण्याच्या हिंदी गीताबद्दल तिला कोणतीही माहिती नव्हती, अशी प्रतिक्रिया नोराने यापूर्वी दिली आहे. अभिनेता संजय दत्त यानेही राष्ट्रीय महिला आयोगासमोर हजेरी लावली. तसेच, 'अनावधानाने' झालेल्या समाजाच्या हानीबद्दल खेद व्यक्त करीत लेखी माफीनामा सादर केला. तसेच सुधारणात्मक उपाय म्हणून सामाजिक कल्याण आणि महिला सक्षमीकरणाचा एक भाग म्हणून ५० आदिवासी मुलींच्या शिक्षणाचा खर्च उचलण्याची हमी संजय दत्त याने दिली.

# ‘ही’ मराठमोठी अभिनेत्री ‘मर्दिनी’त दिसणार



अनेक नवनवीन सिनेमे २०२६ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. मराठी मनोरंजनसृष्टीत सध्या ‘राजा शिवाजी’ सिनेमाची सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे. या चित्रपटाला यश मिळत असतानाच आता आणखी एका सिनेमाचं पोस्टर नुकतंच लॉन्च करण्यात आलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीत आशयप्रधान आणि सामाजिक विषय हाताळणाऱ्या चित्रपटांना नेहमीच प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळत आला आहे. अशाच प्रभावी कथानकासह आता प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे ‘मर्दिनी’. या आगामी मराठी चित्रपटाचं नुकतंच पोस्टर लॉन्च करण्यात आलं आहे. पोस्टरमधून समोर आलेली पहिली झलक आणि त्यावरील आशयपूर्ण कॅप्शनमुळे या चित्रपटाविषयी प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. नारीशक्ती, संघर्ष, आत्मसन्मान आणि आईच्या सामर्थ्याची कथा मांडणारा हा चित्रपट ३ जुलै २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. श्रेयस तळपदे प्रस्तुत ‘मर्दिनी’ हा चित्रपट केवळ स्त्रीशक्तीवर आधारित नसून, आईच्या भावविश्वाला केंद्रस्थानी ठेवणारी ही कथा आहे. पोस्टरवरील आई तारी तिला कोण मारी म्हणजेच लेकरांसाठी आई ज्योतही पेटवते आणि राक्षसांसाठी चिताही हे कॅप्शन चित्रपटाच्या आशयाची प्रभावी झलक देतं. आई ही फक्त प्रेम, माया आणि जपणुकीची प्रतिमा नसते, तर आपल्या लेकरांवर संकट आलं की ती कठोर आणि निर्भय रूप धारण करून त्यांचं रक्षण करण्यासाठी उभी राहते, ही भावना या कथानकातून प्रभावीपणे मांडली जाणार आहे. चित्रपटात एका आईचा संघर्ष, तिची कुटुंबासाठीची झुंज आणि परिस्थितीसमोर न झुकणारी तिची जिद्द यांचा भावनिक प्रवास पाहायला मिळणार आहे. आपल्या लेकरांना सुरक्षित ठेवण्यासाठी एक सामान्य स्त्री कशी परिस्थितीशी दोन हात करते आणि वेळ आली तर ‘मर्दिनी’सारखं सामर्थ्यवान रूप धारण करते, ही या चित्रपटाची मध्यवर्ती संकल्पना आहे. त्यामुळे हा चित्रपट प्रेरणादायी अनुभव देणारा ठरणार आहे. चित्रपटात प्रार्थना बेहेरे, अभिजीत खांडकेकर, जितेंद्र जोशी, राजेश भोसले हे कलाकार दिसणार आहेत. त्यांच्या अभिनयामुळे कथेला अधिक प्रभावीपणा मिळणार असून, मायरा वायकुळ हिची भूमिका कथेत भावनिक पैलू जोडणारी ठरणार आहे. अजय मयेकर यांचा ‘मर्दिनी’ हा दिग्दर्शक म्हणून पहिलाच चित्रपट असून, दिप्ती तळपदे यांच्या निर्मितीखाली हा चित्रपट साकारला जात आहे. सहनिर्माती टिना राकेश कोठारी, छायांकन शब्बीर नाईक, संकलन अभिषेक शेठ तर संगीत हितेश मोडकने दिलं आहे. दरम्यान, आईचं प्रेम, संरक्षण आणि संघर्षाच्या भावनिक कथेला मध्यवर्ती ठेवणारा हा चित्रपट ३ जुलै रोजी भेटीस येणार असून, यामध्ये प्रार्थना बेहेरे महत्त्वपूर्ण भूमिका साकारणार आहे.

# समांथाच्या ’या’ सिनेमातील लुकने वेधलं लक्ष




साऊथ सिनेसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री असलेली समांथा रुथ प्रभू नव्या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. समांथाच्या 'मां इंटी बंगाराम' या सिनेमाचं नवं पोस्टर प्रदर्शित करण्यात आलं असून रिलीज डेटही जाहीर करण्यात आली आहे. या सिनेमात समांथा ॲक्शन मोडमध्ये दिसणार आहे. येत्या १९ जूनला हा सिनेमा प्रदर्शित केला जाणार आहे. 'मां इंटी बंगाराम' सिनेमाच्या नव्या पोस्टरने चाहत्यांची उत्सुकता वाढवली आहे. या पोस्टरवर समांथाचा डॅशिंग अवतार पाहायला मिळत आहे. लाल रंगाच्या साडीमध्ये साध्या महिलेसारखा लूक दिसत आहे. पण, तिच्या हातातली बंदूक आणि डोळ्यांतील आग यामुळे तिचा हा अवतार थरारक वाटत आहे. समांथाने तिच्या 'मा इंती बंगाराम' सिनेमाचं हे नवं पोस्टर सोशल मीडियावरुन शेअर केलं आहे. हे पोस्टर पाहून चाहते तिच्या सिनेमासाठी आणखीच उत्सुक झाले आहेत. विशेष म्हणजे 'मां इंटी बंगाराम' या चित्रपटाची निर्मिती समांथाचा पती राज निदिमोरू आणि डीके यांनी केली आहे. तर दिग्दर्शन नंदिनी रेड्डी यांनी केले आहे. समांथाने यापूर्वी राज आणि डीके यांच्यासोबत 'द फॅमिली मॅन २' आणि 'सिटाडेल: हनी बनी' यांसारख्या वेब सीरीजमध्ये काम केले आहे.

# रणवीर सिंह महादेवाच्या भूमिकेत दिसणार नाही



बॉलीवूडमध्ये सध्या अभिनेता रणवीर सिंह बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. त्याच्या ‘धुरंधर’ आणि ‘धुरंधर २’ या दोन्ही चित्रपटांना प्रेक्षकांनी उदंड प्रतिसाद दिला. त्याच्या भूमिकेचे आणि अभिनयाचे चाहत्यांनी जोरदार कौतुक केले. ‘धुरंधर’च्या प्रचंड यशानंतर रणवीर सिंह कोणता चित्रपट करणार याची उत्सुकता निर्माण झाली आहे. रणवीर ‘हमजा अली मजारी’ या दमदार भूमिकेनंतर भगवान महादेवाची भूमिका साकारणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. लेखक अमिश त्रिपाठी यांच्या ‘शिवा ट्रिलॉजी’वर आधारित पुस्तकांवर भव्य चित्रपट, मालिका तयार होत असून, त्यामध्ये रणवीर सिंह प्रमुख भूमिकेत असल्याची चर्चा होती. मात्र, अमिश त्रिपाठी यांनी यावर भाष्य करीत या चर्चांना पूर्णविराम लावला आहे. लेखक अमिश त्रिपाठी यांच्या ‘शिवा ट्रिलॉजी’ मालिकेवर आधारित चित्रपटात रणवीर भगवान शंकराची भूमिका साकारणार असल्याची चर्चा होती. मात्र, अमिश यांनी हे दावे फेटाळून लावले आणि अमित त्रिपाठी यांनी स्पष्ट केले की, अभिनेता रणवीर सिंह या प्रकल्पाशी जोडलेला नाही. त्यामुळे अभिनेता रणवीर हा भगवान महादेवाची भूमिका साकारणार नसल्याचे स्पष्ट झाले. हा त्याच्या चाहत्यांसाठी धक्का असला तरी लेखक अमिश त्रिपाठी यांनी स्पष्टीकरण देत चर्चा थांबवल्या आहेत. यापूर्वी एका वृत्तात असा दावा करण्यात आला होता की, लेखक अमिश त्रिपाठी यांचा ‘द इमॉर्टल्स ऑफ मेलुहा’ चित्रपट सध्या निर्मितीच्या टप्प्यावर असून, त्यामध्ये रणवीर सिंह प्रमुख भूमिकेत असणार आहे. रणवीरने त्याच्या ‘माँ कसम फिल्म्स’ या निर्मिती संस्थेंतर्गत ‘इमॉर्टल्स ऑफ मेलुहा’ मालिकेचे हक्क विकत घेतले आहेत. तसेच, या मालिकेचे एका भव्य ट्रिलॉजीमध्ये रूपांतर करण्यासाठी या अभिनेत्याने ‘बिर्ला स्टुडिओज’सोबत भागीदारी केल्याचेही वृत्तांत म्हटले होते. मात्र, लेखक अमिशने हे सर्व दावे फेटाळून लावले आहेत. ‘द इमॉर्टल्स ऑफ मेलुहा’चे लेखक अमिश यांनी ‘व्हरायटी इंडिया’ला सांगितले, शिवा ट्रिलॉजीचे हक्क माझ्याकडेच आहेत. आणि अद्याप कोणाशीही कोणताही करार केलेला नाही. अर्थातच, मला रणवीरबद्दल प्रचंड आदर आहे आणि मी त्याचा खूप मोठा चाहता आहे; परंतु ही बातमी खरी नाही, अशा स्पष्ट शब्दांत लेखक अमिश त्रिपाठी यांनी प्रतिक्रिया देत चर्चांना पूर्णविराम दिला आहे.